



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक २५१ * नांदेड * रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## राज्यात पुढील ५ दिवस पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली तर काही ठिकाणी अद्याप पावसाची प्रतिक्षा आहे. गेल्या दीड महिन्यांच्या विश्रांतीनंतर पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. पावसाच्या आगमनामुळे शेतकरी सुखावला आहे. परभणी, लातूर, हिंगोली, धाराशिव आणि जालनामध्ये पावसाची हजेरी पाहायला मिळाली. आता २० ते २५ सप्टेंबरदरम्यान राज्यात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



शुक्रवारी सायंकाळी विजांच्या कडकडाटासह सुरू झालेला पाऊस भंडारा जिल्ह्यातील अनेक भागात रात्री उशिरापर्यंत सुरू होता. सात दिवसांच्या विश्रांतीनंतर आलेल्या या पावसामुळं वातावरणात निर्माण झालेल्या उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. सोबतचं भातपीक आणि भाजीपाला वर्गीय पिकांसाठी हा पाऊस समाधानी ठरला आहे. या पावसामुळं मात्र, काल रात्री ज्यांच्याकडं गणपती आणि गौराई निमित्त जेवणाचा कार्यक्रम होता, अशांची मात्र चांगलीचं तारांबळ उडाली होती. तर वाशिम जिल्ह्यात आज पहाटेपासून काही भागात विजेच्या कडकडाटात मेघगर्जनेसह सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली. बरसणाऱ्या पावसामुळे काहीसा वातावरणात गारवा निर्माण झालाय. मात्र, जिल्ह्यात जोरदार पावसाची प्रतीक्षा मात्र कायम आहे.

बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २० ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा जोर वाढणार आहे, असे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. तर येत्या १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ते २१ सप्टेंबरला नाशिकमध्येही मध्यम पाऊस पडेल. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत मध्यम पावसाची शक्यता आहे. २२ सप्टेंबरला मराठवाड्यातही पाऊस राहील.

२१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहेत. हा मान्सूनच्या हंगामाचा शेवटचा टप्पा असून, या पावसामुळे कोरड्या हवामानातून दिलासा मिळू शकतो. बळीराजाला यामुळे काहीसा दिलासा मिळणार आहे.

## अपघातात एकाच कुटूंबातील सात जणांचा मृत्यू

**भोपाळ (प्रतिनिधी)–** मध्य प्रदेशातील आगर माळवा जिल्ह्यातील प्रसिद्ध बगलामुखी मंदिरात देवदर्शनासाठी गेलेल्या ओडिशातील एका कुटुंबावर परतीच्या प्रवासात काळाने घाला घातला. मुसळधार पावसामुळे रस्त्यावर आलेल्या पाण्यातून कार घेऊन जाण्याचा प्रयत्न करताना कार पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून नाल्यात पडली. शनिवारी पहाटे घडलेल्या या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील सात जणांसह कार चालकाचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, भुवनेश्वर येथे राहणारे हे कुटुंब बगलामुखी मंदिरात दर्शनासाठी गेले होते. देवदर्शन आटोपून ते नलखेडा परिसरातून कारने परतत होते. यावेळी परिसरात मुसळधार पाऊस सुरू होता. त्यामुळे पावसाळी नाल्याचे पाणी वाढले होते आणि रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. कारने पाण्याने भरलेला रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार पाण्यात वाहून गेली. त्यानंतर कार नाल्यात बुडाली.

## दिशा सालियनचे वडील सतीश सालियन मानहानीची नोटीस द्यायला वकिलांसह मातोश्रीवर पोहोचले

### आदित्य ठाकरेंच्या वकिलांनी नोटीस स्वीकारली, मातोश्री बाहेर हायव्होल्टेज ड्रामा

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिशा सालियान मृत्यू प्रकरणात मुंबईतील ठाकरे कुटुंबाचे निवासस्थान असलेल्या 'मातोश्री' बंगल्याच्या गेटबाहेर शनिवारी दुपारी जोरदार हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. दिशा सालियनचे वडील सतीश सालियान हे स्वतः वकिलांच्या टीमसह आमदार आदित्य ठाकरे यांना कायदेशीर नोटीस देण्यासाठी मातोश्रीवर दाखल झाले.

आदित्य ठाकरे यांनी दिशा सालियन प्रकरणी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टनंतर सतीश सालियान यांनी आदित्य ठाकरे आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे. त्यासंदर्भातील नोटीस देण्यासाठी सतीश सालियान हे मातोश्रीवर दाखल झाले होते.

मातोश्रीवर पोहोचण्यापूर्वी प्रसारमाध्यमांशी बोलताना सतीश सालियन अत्यंत आक्रमक पवित्र्यात दिसले. मला कोणीही कंट्रोल करू शकत नाही. फक्त देव मला कंट्रोल करू शकतो, दुसरं कोणीही नाही, अशा कडक शब्दांत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. तर मातोश्रीबाहेर पोहोचताच सतीश सालियन यांनी माझ्यासोबत वकिलांची पूर्ण टीम आहे. त्यांनी वेळ घेतला म्हणून सहा वर्षे गेली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला त्यावर समाधानी आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

सतीश सालियान आणि त्यांच्या वकिलांची टीम आल्याची माहिती मिळताच मातोश्रीवरही हालचालींना वेग आला. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई हे देखील मातोश्रीवर दाखल झाले होते. तर अनिल परब यांनी आदित्य ठाकरेंची बाजू मांडण्यासाठी वकील दिले असून, ॲडव्होकेट राहुल दिवटे आणि ॲडव्होकेट अनिल जाधव हे वकील नोटीस स्वीकारण्यासाठी थेट मातोश्रीच्या मुख्य गेटवर थांबल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, यावेळी मातोश्री बाहेर मोठा गोंधळ पाहायला मिळाला. पोलिसांनी मातोश्रीचे गेट बंद केले होते. मातोश्री बाहेर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. शिवसैनिक मातोश्री बाहेर आक्रमक झाल्याचे दिसून आले. सतीश सालियान यांना आत जाऊ देणार नाही, अशी भूमिका शिवसैनिकांनी घेतली होती. यानंतर आदित्य ठाकरेंना बजावण्यात आलेली ५०० कोटींची अब्रुनुकसानाची नोटीस ठाकरेंच्या वकिलांनी स्वीकारली. नोटीस स्वीकारल्याची पावती सतीश सालियन यांच्या वकिलांना देण्यात आली.

## नांदेड तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण मंगळवारी जाहीर होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीतील सरपंच पदाच्या आरक्षणाची अधिसूचना जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग यासाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी नांदेड यांच्या दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायतींसाठी नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १७ सरपंच पदे, तर खुल्या प्रवर्गासाठी ३७ सरपंच पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. यापैकी एकूण २८ सरपंच पदे महिलांसाठी राखीव असतील. नागरिकांचा मागास प्रवर्गातील ९ आणि खुल्या प्रवर्गातील १९ पदे महिलांसाठी राखीव राहतील.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या सरपंच पदांच्या आरक्षणात बदल होत नसल्याने, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग यांचे आरक्षण निश्चित करण्याचे आदेश तहसीलदार, नांदेड यांना देण्यात आले होते. त्यानुसार ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गातील सरपंच पदांचे आरक्षण सोडत पद्धतीने मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता तहसील कार्यालय, नांदेड येथील मा. उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्या बैठक कक्षात (दुसरा मजला) निश्चित करण्यात येणार आहे.

हे आरक्षण सन २०२५ ते २०३० या कालावधीत होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी लागू राहणार आहे. या सोडतीसाठी सर्व संबंधित तसेच माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य यांनी निर्धारित दिनांक व वेळेस तहसील कार्यालय, नांदेड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार, नांदेड यांनी केले आहे.

## दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्र्यांचा ताफा अडवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळसदृश्य परिस्थिती, पिकांचे नुकसान, कर्जमाफी आणि पीकविम्याच्या प्रश्नावर शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेल्या असंतोषाचे पडसाद शुक्रवारी नांदेडमध्ये उमटले. दुष्काळी पाहणी दौऱ्यावर आलेल्या राज्याच्या कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा ताफा विभागीय बैठकीसाठी जात असताना काँग्रेस कार्यकर्त्यांनी गाडीसमोर येत जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

कृषिमंत्र्यांचा ताफा विभागीय बैठकीच्या ठिकाणी रवाना होत असताना काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्त्यावर येत 'शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे', 'पीकविमा मिळालाच पाहिजे' अशा घोषणा दिल्या. कार्यकर्त्यांनी ताफा अडवण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत आंदोलकांना बाजूला केले. त्यानंतर कृषिमंत्र्यांचा ताफा बैठकीसाठी रवाना झाला. यापूर्वी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी कृषिमंत्र्यांची भेट घेऊन पिकांच्या नुकसानीची वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्यासाठी जळालेल्या आणि वाळलेल्या सोयाबीनचे पीक भेट दिले होते. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे अपेक्षित गांभीर्याने



पाहिले जात नसल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. उपस्थित काँग्रेस कार्यकर्त्यांनी मराठवाडा दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी केली.

पावसाच्या अनिश्चिततेमुळे आणि पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सणासुदीच्या काळातही शेतकऱ्यांच्या घरात चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे सरकारने केवळ पाहणी दौरे न करता प्रत्यक्ष मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका काँग्रेस कार्यकर्त्यांनी मांडली. आगामी दिवाळी शेतकऱ्यांसाठी तरी दिलासादायक ठरावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, श्रावण रॅपणवाड, गोविंद पाटील, शंकर बाजीराव शिंदे यांच्यासह काँग्रेसचे अधिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## लालबागच्या राजाच्या दर्शन रांगेत तरूणाचा मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईतील लालबागचा राजाच्या दर्शनासाठी गेलेल्या जळगावच्या २५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

जळगाव शहरातील जीवनमोती नगर येथील रहिवासी जयदीप मेघराज नेमाडे हा आपल्या मित्रांसोबत १७ सप्टेंबर रोजी लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत आला होता. दर्शनासाठी रांगेत उभा असताना अचानक त्याला चक्कर आली आणि तो खाली पडला. त्यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. या घटनेमुळे नेमाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, एकुलता एक मुलगा गमावल्याने कुटुंबीयांवर मोठा आघात झाला आहे. जयदीपच्या आकस्मिक मृत्यूने जळगाव शहरातही हळहळ व्यक्त होत आहे.

जयदीप नेमाडे गेल्या ४ ते ५ वर्षांपासून दरवर्षी आपल्या मित्रांसोबत लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी येत होता. यंदाही तो आपल्या चार मित्रांसोबत पुण्याहून मुंबईला आला होता. १७ सप्टेंबर रोजी दर्शनासाठी रांगेत उभा असताना अचानक त्याला अस्वस्थ वाटू लागले. काही वेळातच तो चक्कर येऊन खाली कोसळला. जयदीपची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

## निकष शिथिल करून शेतकऱ्यांना मदत द्या -खा. चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** पावसाचा खंड आणि तुटीमुळे संपूर्ण मराठवाड्यात पिकांची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. यंदा पेरणीचे क्षेत्रही घटले आहे. सध्याच्या या गंभीर परिस्थितीची दखल घेत शासनाने नेहमीचे निकष शिथिल करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.



यंदाचे कमी पर्जन्यमान, त्यामुळे पिकांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांना करावयाच्या मदतीच्या उपाययोजना, या अनुषंगाने आज नांदेड येथे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागाची आढावा बैठक पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खा. चव्हाण म्हणाले की, सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीन पिवळे पडले असून वाढ खुंटल्यामुळे यंदा कापसाचे पीकही हाती येण्याची शक्यता दुरावली आहे. त्यामुळे शासनाने कुठल्याही तांत्रिक निकष आणि वेळापत्रकात न अडकता मदतीसाठी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

या बैठकीत बोलताना त्यांनी पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणावर तीव्र संताप व्यक्त केला. जिल्हाधिकारी, कृषी विभाग आणि महसूल विभाग सहमत असतानाही विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे दावे नाकारल्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. प्रशासकीय स्तरावर झालेल्या निर्णयांच्या विरोधात विमा कंपन्यांनी अपील करणे संतापजनक आहे. वर्तमान परिस्थिती लक्षात घेता, विमा भरपाईसाठी निकष शिथिल करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा कसा देता येईल, याचा विचार करण्याची आवश्यकता असल्याचेही खा. चव्हाण म्हणाले.

दुष्काळी परिस्थितीमुळे मजुरांच्या हाताला काम उपलब्ध न झाल्यास त्यांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होण्याची शक्यता आहे. हे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना गावातच काम उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याची सूचना त्यांनी मांडली. तूर्तास चारा उपलब्ध असला, तरी भविष्यात हा प्रश्न गंभीर होणार आहे. त्यामुळे चारा छावण्यांचे योग्य नियोजन करावे आणि यात कोणताही भ्रष्टाचार होऊ नये, यासाठी प्रशासनाने आधीच खबरदारी घ्यावी, असेही ते पुढे म्हणाले.

## २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताचा टी २० संघ जपानला रवाना


**मुंबई (प्रतिनिधी)–** जपानमध्ये होणाऱ्या २०व्या एशियन गेम्ससाठी श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया रविवारी सकाळी नवी दिल्लीहून नागोयासाठी रवाना होणार आहे. मात्र, उड्डाणाच्या काही तास आधीपर्यंत खेळाडूंच्या जर्सी आणि किटवरून गोंधळ सुरू होता. परिस्थिती लक्षात घेता भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अधिकृत किट पुरवठादार जेएसडब्ल्यू इन्स्पायर यांच्यात सातत्याने चर्चा सुरू होती. एशियन गेम्सच्या दौऱ्यावर भारतीय क्रिकेटपटूंना दोन वेगवेगळ्या किटमध्ये खेळावे लागणार आहे. २२ सप्टेंबर रोजी जपानविरुद्ध होणाऱ्या टी-२० सामन्यात टीम इंडिया बीसीसीआयची जर्सी परिधान करणार आहे.

## रशियावर निर्बंध लादणाऱ्या विधेयकावर डोनाल्ड ट्रम्प यांची स्वाक्षरी

### रशियाकडून तेलखरेदी करणाऱ्या भारत आणि चीनसह इतर देशांवर १०० टक्के अतिरिक्त टॅरिफसाठी खटाटोप

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता भारतावर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावू शकतात. ट्रम्प यांनी या विधेयकावर स्वाक्षरी करून त्याचे कायद्यात रूपांतर केले आहे. अमेरिकन संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधीगृहाने, रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावणारे विधेयक मंजूर केले.

या विधेयकाच्या बाजूने २६२ आणि विरोधात १५९ मते पडली. सिनेटने ऑगस्टमध्ये ८६-११ मतांनी हे विधेयक मंजूर केले होते. याचे अधिकृत नाव 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण क्ट ऑफ २०२६' असे आहे. रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांच्या अमेरिकन यादीत चीन, भारत, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि अझरबैजान यांचा समावेश आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ४० टक्क्यांपेक्षा जास्त तेल रशियाकडून खरेदी करतो. अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी दर १८० दिवसांनी या यादीचे मूल्यांकन करतील. अमेरिकेने लावलेल्या १०० टक्के शुल्काबाबत, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की देशाच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर, भारताने रशियाकडून स्वस्त कच्च्या तेलाची खरेदी वेगाने वाढवली.




## नांदेडमध्ये चोरट्यांचे धाडस; डीवायएसपी कार्यालयातील कर्मचाऱ्याचे घर फोडले, लाखोंचा ऐवज लंपास

### एसपी डॉ. रोहन यांची घटनास्थळी भेट, 'महालक्ष्मी'साठी गावी गेले असताना चोरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील जुना कौठा भागात चोरट्यांनी चक्क एका पोलीस कर्मचाऱ्याच्याच घरावर डल्ला मारून लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १८ सप्टेंबर) रात्री घडली. हा पोलीस कर्मचारी उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) शहर यांच्या कार्यालयात कार्यरत आहे. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुना कौठा येथील रामबाग सोसायटीमध्ये हा प्रकार घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, गौरी पूजन सणानिमित्त संबंधित कर्मचारी आपल्या कुटुंबीयांसह घराला कुलूप लावून आपल्या गावी गेले होते. अज्ञात चोरट्यांनी या संधीचा फायदा घेत घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील ५ तोळे सोने, ६ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम असा लाखोंचा मुद्देमाल लंपास केला.

ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांनी सर्व यंत्रणांना तातडीने तपासाच्या सूचना दिल्या. घटनास्थळी श्वानपथक, फिंगरप्रिंट तज्ज्ञ, स्थानिक गुन्हे शाखा आणि नांदेड ग्रामीण पोलिसांचे पथक दाखल झाले असून तपास सुरू आहे. स्वतः पोलीस अधीक्षक डॉ. रोहन यांनीही घटनास्थळाला भेट दिल्याचे सांगण्यात आले.


विशेष म्हणजे पोलीस अधीक्षक कार्यालयात मासिक गुन्हे आढावा बैठक असल्याने सर्व अधिकारी कार्यालयात उपस्थित होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या आदेशावरून अनेक पथके या घरफोडीचा शोध घेत आहेत.

**पिस्तूल आणि जिवंत काडतूसे**

दरम्यान, या घरफोडीत शासकीय पिस्तूल आणि काही जिवंत काडतुसेही चोरीला गेल्याची चर्चा असली तरी याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. स्थानिक गुन्हे शाखेने काही संशयितांना ताब्यात घेऊन कसून चौकशी सुरू केली आहे.

## नांदेडच्या सुपुत्राची मोठी झेप; डॉ. संजय लाठकर यांची अणुऊर्जा विभागाच्या सुरक्षा महासंचालकपदी नियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र आणि परभणी व लातूरचे माजी पोलीस अधीक्षक असलेले वरिष्ठ आयपीएस अधिकारी डॉ. संजय आनंद लाठकर यांची पंतप्रधानांच्या अधिपत्याखालील अणुऊर्जा विभागात महासंचालक (सुरक्षा) या अत्यंत महत्त्वाच्या पदावर नियुक्ती झाली आहे.



केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने (एसीसी) त्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव मंजूर केला असून, दि. १५ सप्टेंबर रोजी कार्मिक, सार्वजनिक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने या आदेशावर शिक्कामोर्तब केले आहे.


यापूर्वी दि. १२ जून २०२६ रोजी कॅबिनेट नियुक्ती समितीने डॉ. लाठकर यांची केंद्र सरकारच्या अखत्यारीतील पोलीस महासंचालक किंवा समकक्ष पदावरील नियुक्तीसाठी निवड केली होती. त्यानुसारच त्यांना ही मानाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

डॉ. संजय लाठकर यांनी आपल्या सेवाकाळात बिहार, झारखंडमधील ७ नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये, महाराष्ट्रात लातूर आणि परभणी येथे जिल्हा पोलीस अधीक्षक, दहशतवाद विरोधी पथकाचे (एटीएस) उपमहानिरीक्षक म्हणून, तसेच सीआरपीएफमध्ये गडचिरोली व झारखंड राज्यात महानिरीक्षक आणि अतिरिक्त पोलीस महासंचालक अशा विविध महत्त्वाच्या पदांवर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

त्यांच्या या धाडसी सेवेबद्दल त्यांना शौर्य पदक, सुरक्षा पदकासह एकूण ११ पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्यावर पदोन्नतीबदल नांदेडमधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बाजार

## कथा



एकोणीशे सत्त्याऐंशीचा काळ असेल बहुधा... मी इयत्ता सहावीत शिकत होतो. दिपावलीच्या सुट्टीला गावी पोहोचलो. तसे माझे शिक्षण आजोळी चालू होते. मामाच्या गावातच ४ थी पर्यंतच शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी मला शहराच्या ठिकाणी कुंडलवाडीला ठेवण्यात आले. रहायला वसतीगृह! दिपावलीच्या सुट्टीची सूचना वर्गात गुरुजींनी वाचून दाखवली अन् वर्गात एकच गलका झाला. हुर्रे... हुर्रे...चा आवाज घुमला. सरांनी सर्वांना शांत केले आणि म्हणाले, सुट्टी लागली म्हणून इतके आनंदी होऊ नका... हं! सुट्टीत मी खूप अभ्यास, गृहपाठ देत आहे... ते लिहून घ्या असं चढत्या स्वरात म्हणताच आमचा आनंद हवेतच विरला. सरांनी फळ्यावर लिहिले... सुट्टीत बाजाराला जा... बाजार करा... बाजारातील गंमती- जमती तुमच्या शब्दांत लिहून आणा. सर्वोत्कृष्ट अनुक्रमे तीन क्रमांकातून प्रजासत्ताक दिनी रोख बक्षिस दिले जाईल. मग आम्हाला रोख बक्षिस म्हणताच पुन्हा आनंदाचे डोहाळे लागले. पण उपक्रम अवघड नसला तरी प्रात्यक्षिक असल्याने आम्ही काही कळीचे प्रश्न उपस्थित केले. गुरुजी वडिल आम्हाला बाजारात पाठवत नाहीत! पैसे देत नाहीत.

आमच्या गावी बाजार भरत नाही, शेजारी गावात भरतो. गुरुजींनी सांगितले, वडिलांना सांगा हे सुट्टीतले गृहपाठ आहे, साधा आहे. बक्षिस मिळणार आहे. आम्हाला बाजाराला घेऊन चला सोबत किंवा स्वतः एकटे बाजाराला जाऊ द्या. गावात नसेल तर शेजारी गावच्या बाजारात जाऊन बाजार कराच, असा जणू वटहुकूमच गुरुजींनी काढला! तेंव्हा आता हे उपक्रम केल्याशिवाय गत्यंतर नाही, असा आमचा ठाम विश्वास झाला जे उपक्रम करणार नाहीत त्यांना वार्षिक परीक्षेत या उपक्रमाचे गुण मिळणार नाहीत अशी गुगली टाकून गुरुजींनी अशा उपक्रमात भाग न घेणाऱ्यांना जणू इशाराच दिला. मग सर्व वर्ग चिडीचूप... कसे करावे बाजार, पैसे किती घ्यावे... काय काय खरेदी करावे... अशा प्रश्नांच्या गर्तेत प्रत्येकजण हरवून गेले. मग शाळेची घंटा वाजली. आम्ही गावाकडे जाण्यास मोकळे झालो. सर्व विद्यार्थी सुट्या लागल्या म्हणून उड्या मारुन वर्गाच्या बाहेर पडत असताना आम्ही मात्र उपक्रमाचे भूत डोक्यात घेऊन चिंताग्रस्त मुद्रेने...धीरगंभीरपणे दप्तर पाठीवर घेऊन वसतिगृहाची वाट धरली. सर्व कपडे घालून पिशवी आदल्या दिवशीच भरुन ठेवली होती. वसतिगृहात येताच पेटी उघडली अन् पिशवी काढून गावाकडे रवाना होण्याकरीता बसस्थानकाची वाट धरली. नेहमी वेळेवर धावणारी आमच्या गावची बस आज मात्र उशिराच आली.

आम्ही सर्व मित्र बसमध्ये बसलो आणि एकदाचे गावी पोहोचलो. ते बाजाराच्या उपक्रमाचे गाठोडे डोक्यात घेऊन! सर्व हकीकत वडिलांना रात्रीच आल्या आल्या कानावर घातलो. वडील शांत ऐकून घेऊन कसेबसे बाजार करण्यास होकार दिला तेही एका अटीवर... ते म्हणजे फक्त शंभर रुपये बाजाराला देणार! शंभर रुपयांत काय आणायचे? कसे आणायचे? ते ठरव मग मी पुरता खचलो! शंभर रुपयांत काय बाजार करणार? परंतु विचार केला, नियोजन केले, पिशवी घेतली. सकाळ होताच गावच्या शेजारी असलेल्या कासराळी या गावी बाजार करायला माझी दांडीयात्रा सुरु झाली. कारण ऑटो नव्हते. बस दोनच वेळा सकाळी आणि संध्याकाळी. बाकी वेळा पायी जाणे हाच शिरस्ता! बाजार कासराळीचा भरतो. सोमवारी.

आजूबाजूचे मिळून दहा- बारा गावचे व्यापारी, शेतकरी, भाजीपालावाले, किराणावाले कासराळीला यायचे. बाजार पहिल्यांदाच करणार होतो... सोबत कोणी नाही... एकटाच विचार चक्र सुरु झाले... विचार करत करत मजल... दरमजल करत कसाबसा कासराळीला पोहोचला... सर्व बाजार फिरलो. बाजारावर नजर फिरवली अन् कुठून सुरु करायचे खरेदीला? असं विचारात असतानाच सयाजी लंके नावाचा माझा बालदोस्त भेटला आणि खांद्यावर हात घालून चल जाऊ... म्हणत थेट भाजीपाल्याच्या मार्केटमधून मला कुठेतरी घेऊन जात होता... मी त्याच्या सोबत मुक्याने जात होतो. तेवढ्यात त्याचं इच्छित स्थळ आले. बघ... हे नवीनच पिक्चर हाय... नवीनच हिरो हाय... फुल और काटे हे पिक्चर बघू आपण दोघे मिळून... म्हणून त्याने मला गळ घातली. मी नको... नको म्हणत होतो.

मला बाजार करायचे... घरी जायला उशिर होतो असा बहाणा करु लागलो. परंतु तो ऐकायला तयारच नव्हता. पोस्टर बघ... कसे फुल फाईटींग... फुल हातापायी... गीतांची मेजवाणी असे काहीबाही त्या पोस्टरवर लिहून होते. पोस्टर पाहून मलाही नवल वाटले. कधी व्हिडीओत गेलो नव्हतो. पिक्चर कसा असतो याची कल्पना नव्हती. घरी ना टीव्ही... ना रेडिओ! त्यामुळे माझीही उत्कंठता वाढीस लागली. बघावेच एकदा... काय व्हते... बाजाराचे काय... करु घंट्याने... म्हणून त्याच्यासोबत शिरलो व्हिडीओत. मध्ये लोकांची तुंबळ गर्दी... वर्गासारखी... बसायला बेंच, समोर भलामोठा टी.व्ही... समोर मोठ्या भिंगाची काच! त्यामध्ये चित्र मोठे दिसत होते. फॅन बंद... घामाघुम झालो... तीन घंटे कधी गेले पत्ता नाही लागला. पहिला चित्रपट पाहण्याचा आनंद एकीकडे तर दुसरीकडे मन लावून बाजार करायला वेळ न मिळाल्याचे दुःख! मग घाई गडबडीने बाजार गुंडाळला! कसेबसे तमाटे, वांगे, मेथी अन् बुंदीचे लाडू घेऊन कासराळीतून एकदाचा निसटलो...

मग काय कसेतरी बाजार झाला ना... अनुभवाचे काय... बाजारातील गंमती जमती काय... जे घडलं ते लिहू... उपक्रमात असं मनाशी खूणगाठ बांधून एकदाचं घरी पोहोचलो. संध्याकाळी वडील कामावरुन घरी आले आणि म्हणाले, मग काय काय बाजार आणला? शंभर रुपयाचा हिशोब द्या लिहून! मग माझी आता चांगलीच पंचाईत झाली. आता कसे करायचे पिक्चरचे दोन रुपये कसे मांडायचे? पिक्चर बघायला पाठवले का म्हणून वडील मला तुडवणारच या भितीने कावराबावरा झालो. वडिल म्हणाले, एवढे घाबरायला काय आबाळ पडलय का अंगावर? गाढवा... कागदावर लिही... वांगे किती रुपयाचे, मेथी कितीची असे मग झाला हिशोब!

हात थर- थर करत होता. नेहमी वेगाने लिहिणारी बोटे लकवा मारल्याप्रमाणे हालत होती. हिशोब लिहून काढला. प्रामाणिकपणाने खरा हिशोब लिहिला. व्हिडीओ पाहिल्याचे दोन रुपये मात्र हरवल्याचा बहाणा केला. परंतु वडिल म्हणाले, हरवतातच कसे? बरोबर हिशोब दे नाहीतर पोळ्याला बनवलेला चाबूक हाती घेऊ का? असे डोळे वटारुन मला दरडावले. आता काही खरं नाही म्हणून प्रामाणिकपणे सांगितले, बाबा त्या कासराळीच्या दोस्ताने मला पिक्चर बघाय व्हिडीओला घेऊन गेला असं म्हणताच बाबांनी सणकन कानाखाली वाजविली. मी हंबरडा फोडून रडू लागलो. वाड्यातील सर्व काकू, चुलतभाऊ, बहिण, दोन चुलते जमा झाले. लेकराला का मारतोस म्हणू लागले. यावर बाबा म्हणाले, बघा याला बाजाराला पैसे दिले तर बाजार सोडून व्हिडीओत पिक्चर बघत बसला म्हणताच माझी कोणीही बाजू घेतली नाही. सगळे हिन नजरेने माझ्या तोंडाकडे पाहू लागले. मी खूप केविलवाणा होऊन सांगितले तरी बाबांनी काही समजून घेतले नाही. नंतर राग थंड झाल्यावर बाबा जेवताना म्हणाले, कोणता पिक्चर बघितला मग? मी म्हणालो, फुल और काटे... बाबा फिरकी घेत म्हणाले, मग तु काय बोध घेतला यातून. फुल घेतला की काटे, मग बाबा म्हणाले, आर बापू जीवनात काटे मोडल्याशिवाय गळ्यात फुल पडत नाहीत बाबा म्हणताच माझं मन भानावर आलं. मग मोठा श्वास सोडून बाबाचे पाय धरले आणि यापुढे पिक्चर बघायला जाणार नाही, असा शब्द दिला. सर्व ध्यान शिक्षावर देईन. अभ्यास करुन मोठा साहेब व्होतो बाबा म्हणालो. मग बाबा थोडं फ्रेश झाले. पाठीवर हात ठेवला आणि म्हणाले, उद्या मंगळवार बिलोलीचा बाजार आहे, जातो का? मग बाबा आता कुठंच जाईना. बाजारात तर जाईचना. सुट्या आहेत मामाच्या गावाला जातो म्हणताच, बाबांनी होकार देऊन आजोळी पाठवले. आणि सुट्या संपल्यावर लगेच वसतिगृहाला जाण्याचा दम देऊन निरोप घेतला. मग काही दिवसांनी सुट्या संपल्या शाळेत गेलो. गुरुजींनी गृहपाठाचा आढावा घेतला. चला सर्वांनी बाजाराचे अनुभव लिहून काढण्याची सूचना दिली. मग काय मी जशाचा तसा प्रसंग बाजार मुळे झालेली फजिती लिहून काढली. सरांनी वाचून मला पुन्हा छडीने धुलाई केली. अरे मूर्खा यासाठी

बाजारात जायला सांगितले का म्हणून वर्गात पुन्हा दोस्तांसमोर खाली मान घालून चालावे लागले. पण आता तोच प्रसंग मान वरी करुन मोठेपणाने सांगताये. दर बाजाराला त्या आठवणी नजरेसमोरुन तरळतात... असा बाजार न विसरणारा...

**– मारोती भु. कदम**
जि.प.प्रा. शाळा पिंपळगांव (लिखा)
ता. पूर्णा जि. परभणी.
मो. ९०४९०२५३५१

# गणरायाचे रूप, तत्त्वज्ञान आणि 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष



प्रथमपूज्य गजानन गणेश हे भारतीय जनमानसाच्या श्रद्धेचे अढळ केंद्र आहेत. आज जगाच्या कानाकोपऱ्यात गणेशभक्तीचे दर्शन घडते. हिंदू धर्मातील कोणतेही शुभकार्य विघ्नहर्ता, सुख-समृद्धी, वैभव आणि आनंदाचे अधिष्ठाता असलेल्या गणरायाला वंदन केल्याशिवाय सुरू केले जात नाही. म्हणूनच गणेशाला 'प्रथमपूज्य' आणि 'विघ्नहर्ता' असे मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. शास्त्रीय मान्यतेनुसार भगवान गणेशांचा अवतार भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या मध्यान्हकाळी झाला. त्यामुळे या दिवशी सनातन परंपरेनुसार सिद्धिविनायक स्वरूपातील गणेशाची विधिवत स्थापना करून पूजा-अर्चना केली जाते. चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत दहा दिवसांचा हा गणेश जन्मोत्सव देशभर अत्यंत श्रद्धा, भक्तिभाव आणि उत्साहाने साजरा केला जातो. यंदा हा मंगलमय लोकोत्सव १४ सप्टेंबरपासून सुरू होऊन २५ सप्टेंबरपर्यंत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी रंगणार आहे.

**भक्तांच्या मनातील गणरायाची असंख्य रूपे**

गणेशोत्सवाच्या काळात गिरिजानंदन गणेश भक्तांच्या घराघरांत विविध मनोहारी रूपांत विराजमान होतात. गणरायाचे व्यक्तिमत्त्व इतके बहुरंगी आणि कल्पनाशील आहे की प्रत्येक कलाकाराला आपल्या कल्पना, भावना आणि दृष्टिकोनातून त्यांचे वेगळे रूप साकारण्याची संधी मिळते. कुठे गणरायाच्या हातात मोदक असतो, तर कुठे त्यांच्या मस्तकावर आकर्षक पगडी दिसते. काही मूर्तींमध्ये ते मूषकावर आरूढ झालेले असतात, तर काही ठिकाणी निवांत मांडी घालून बसलेले दिसतात. कुठे ते आकर्षक भावमुद्रेत नृत्य करताना दिसतात, तर कुठे बालरूपात भक्तांचे मन मोहून घेतात. या विविध रूपांमधून गणरायाशी भक्तांचे असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि भक्तीचे विविध रंग अनुभवायला मिळतात.

**गणेशाच्या प्रत्येक अवयवात जीवनाचे तत्त्वज्ञान**

गजाननाचे रूप जितके मनोहारी आहे, तितकेच त्यामागील तत्त्वज्ञानही अर्थपूर्ण आणि बोधप्रद आहे. आपल्या सनातन संस्कृतीत 'गज' या शब्दाचीही तात्त्विक मांडणी करण्यात आली आहे. महामनीषी पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या मते, 'गज' या शब्दातील 'ग' हे गंतव्य अर्थात ध्येयाचे, तर 'ज' हे जन्म अर्थात उगमाचे प्रतीक आहे. त्यामुळे 'गज' या शब्दाचा भावार्थ निश्चित ध्येयासाठी जन्माला आलेली आणि त्या ध्येयासाठी समर्पित होणारी दिव्य शक्ती असा होतो. गणेश हे शौर्य, साहस आणि नेतृत्वाचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या हेरंब रूपातून सामर्थ्याचे, विनायक रूपातून प्रभावी शक्तीचे, तर विघ्नेश्वर रूपातून संकटे दूर करून आनंद देणाऱ्या स्वरूपाचे दर्शन घडते. 'गण' म्हणजे समूह किंवा समुदाय आणि त्या समूहाचे स्वामी म्हणजे 'गणपती'. म्हणूनच गणेशाला गणाध्यक्ष, लोकनायक आणि गणपती अशा विविध नावांनी संबोधले जाते.

**गणरायाच्या रूपातून मिळणारी व्यवस्थापनाची शिकवण**

रिद्धी-सिद्धीचे प्रदाता गजाननाच्या अनोख्या शरीररचनेत जीवन जगण्याची आणि उत्तम नेतृत्व करण्याची अनेक सूत्रे दडलेली आहेत. विशाल गजमुख सर्वोच्च बुद्धिमत्ता, विवेक आणि व्यापक विचारशक्तीचे प्रतीक मानले जाते. लांब सोंड संकटांचा दूरवरून अंदाज घेण्याची आणि परिस्थितीचा सूक्ष्म वेध घेण्याची क्षमता शिकवते. छोटे पण खोलवर पाहणारे डोळे बाह्य रूपापलीकडे जाऊन सूक्ष्म अर्थ समजून घेण्याचा संदेश देतात. गणेशाचे मोठे, सूपासारखे कान ऐकण्याचे महत्त्व अधोरेखित करतात. कोणतीही गोष्ट ऐकताच त्यावर प्रतिक्रिया न देता ती समजून घ्यावी, असा त्यातून संदेश मिळतो. त्यांचे लांबट उदर ऐकलेल्या गोष्टींची गुप्तता राखण्याबरोबरच इतरांच्या उणिवा आणि कमतरता सामावून घेण्याची शिकवण देते. गणेशांची स्थूल देहयष्टी गांभीर्य, स्थैर्य आणि नेतृत्वाचे प्रतीक आहे. तर त्यांचे वाहन असलेला मूषक कुतर्क, संशय आणि दुसऱ्यांच्या उणिवा शोधण्याच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्याचा संदेश देतो. अशा प्रकारे गणेशाच्या प्रत्येक अवयवात जीवन जगण्याची, नातेसंबंध जपण्याची, नेतृत्व करण्याची आणि उत्तम मानवी व्यवस्थापनाची एक सुंदर शिकवण दडलेली आहे.

**'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष का केला जातो?**

दहा दिवसीय गणेशोत्सवात देशभरातील भक्त बल, बुद्धी आणि विद्येचे प्रदाता मंगलमूर्ती गणेशाची आरती आणि वंदना करतात. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकाच्या ओठांवर एकच जयघोष असतो 'गणपती बाप्पा मोरया!' पण हा जयघोष नेमका का केला जातो? 'मोरया' या शब्दामागील कथा तुम्हाला माहीत आहे का? गणेशपुराणाशी संबंधित एका कथेनुसार, एकदा सिंधू नावाच्या महादैत्याने देवगणांना मोठ्या संकटात टाकले होते. त्यावेळी देवांचे सेनापती कार्तिकेय उच्च शक्ती प्राप्त करण्यासाठी तपश्चर्येत मग्न होते. त्यामुळे देवांच्या रक्षणासाठी गणेशांनी कार्तिकेयांचे वाहन असलेल्या मयूराला आपले वाहन केले आणि सहा भुजांचे रूप धारण करून सिंधू दैत्याचा वध केला. गणेशांनी सिंधूचा पराभव करून देवांना त्याच्या अत्याचारातून मुक्त केले. त्यांच्या या विजयाने आनंदित झालेल्या देवांनी गणेशाचा जयजयकार केला आणि त्यांची पूजा केली. मयूराला वाहन केल्यामुळे गणेशाचे हे रूप 'मयूरेश्वर' म्हणून प्रसिद्ध झाले. याच मयूरेश्वराशी जोडलेल्या परंपरेतून 'मोरया' हा भक्तीपूर्ण जयघोष रूढ झाल्याचे मानले जाते. त्यामुळे 'गणपती बाप्पा मोरया' हा केवळ उत्साहाचा नारा नसून भक्ती, विजय आणि गणरायावरील अढळ श्रद्धेचे प्रतीक बनला आहे.

**घरगुती उत्सवापासून सार्वजनिक गणेशोत्सवापर्यंत**

इतिहासकारांच्या मते, प्राचीन काळापासून अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत गणेश जन्मोत्सवाची परंपरा प्रामुख्याने घरगुती स्वरूपात होती. महाराष्ट्रातील विविध राजघराण्यांनीही गणेशभक्तीला प्रोत्साहन दिले. सातवाहन, राष्ट्रकूट आणि चालुक्य यांसारख्या राजघराण्यांच्या काळात गणेश उपासनेला महत्त्व प्राप्त झाले. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गणेशोत्सवाला धार्मिक परंपरेसोबतच समाजजीवन, संस्कृती आणि राष्ट्रभावनेशी जोडणारे व्यापक स्वरूप प्राप्त झाले. आजचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव राहिलेला नाही. तो कला, संस्कृती, सामाजिक एकोपा, लोकसहभाग आणि भक्तीचा लोकोत्सव बनला आहे. गणरायाच्या मूर्तीतील प्रत्येक रूप, प्रत्येक अवयव आणि प्रत्येक परंपरा आपल्याला काही ना काही शिकवून जाते. म्हणूनच गणेशोत्सवात केवळ गणरायाचे दर्शन घेणे नव्हे, तर त्यांच्या रूपामागील संदेश समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बुद्धीने विचार करा, विवेकाने निर्णय घ्या, संकटांना धैर्याने सामोरे जा, इतरांचे ऐका आणि समाजाला सोबत घेऊन पुढे चला हाच गणरायाच्या रूपातील खरा जीवनसंदेश आहे.

**–मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि.सांगली

# अभिनयाचा सहजसुंदर प्रवास! ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार



भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाच्या जोरावर स्वतंत्र ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मानांपैकी एक असलेला हा पुरस्कार त्यांच्या पाच दशकांहून अधिक काळाच्या समृद्ध कलाप्रवासाचा गौरव करणारा आहे. कन्नड चित्रपटसृष्टीसह हिंदी आणि अन्य भारतीय भाषांमधील चित्रपटांत आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणाऱ्या अनंत नाग यांच्या कारकिर्दीचा हा महत्त्वपूर्ण सन्मान आहे. १६ सप्टेंबर २०२६ रोजी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, २२ सप्टेंबर रोजी गुजरातमधील केवडिया येथे होणाऱ्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

चित्रपटसृष्टीत लोकप्रियता मिळविण्यासाठी केवळ देखणे व्यक्तिमत्त्व, संवादफेक किंवा नायकाची प्रतिमा पुरेशी नसते. अभिनयातील सहजता, व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास, भावभावनांची अचूक अभिव्यक्ती आणि भूमिकेशी एकरूप होण्याची क्षमता या गुणांच्या बळावर एखादा कलाकार प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतो. अनंत नाग हे अशाच गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध असलेले अभिनेते आहेत. त्यांनी साकारलेल्या विविध भूमिका केवळ मनोरंजन करणाऱ्या नसून मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडणाऱ्या आहेत. त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकता आणि संयम ही त्यांची खरी ओळख ठरली आहे.

४ सप्टेंबर १९४८ रोजी जन्मलेल्या अनंत नाग यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात कन्नड चित्रपटातून केली. 'संकल्प' हा त्यांचा पहिला कन्नड चित्रपट, तर 'अंकुर' या हिंदी चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी कन्नड, हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि मराठी अशा विविध भाषांतील चित्रपटांमध्ये काम केले. तीनशेहून अधिक चित्रपटांमधील त्यांचा सहभाग त्यांच्या प्रदीर्घ आणि बहुआयामी कारकिर्दीची साक्ष देतो.

अनंत नाग यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःला एका ठरावीक चौकटीत बंदिस्त होऊ दिले नाही. नायक, सहायक अभिनेता, गंभीर स्वभावाची व्यक्तिरेखा, सामान्य माणसाचे जीवन जगणारा मध्यमवर्गीय किंवा विनोदी भूमिकेतील सहज अभिव्यक्ती अशा विविध स्वरूपांत त्यांनी आपली अभिनयक्षमता सिद्ध केली. त्यांच्या अभिनयात कृत्रिमतेपेक्षा वास्तवाला अधिक महत्त्व असते. पडद्यावर ते एखाद्या व्यक्तिरेखेच्या रूपात समोर येतात, तेव्हा प्रेक्षकांना त्या व्यक्तिरेखेत एक परिचित माणूस दिसतो. हीच त्यांच्या अभिनयाची खरी ताकद आहे.

कन्नड चित्रपटसृष्टीत अनंत नाग यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. व्यावसायिक चित्रपट आणि समांतर चित्रपट अशा दोन्ही प्रवाहांत त्यांनी काम केले. चित्रपट केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील वास्तव, मानवी नातेसंबंध आणि जीवनातील संघर्ष व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव त्यांच्या अनेक भूमिकांमधून होते. त्यांनी विविध दिग्दर्शकांसोबत काम करताना व्यक्तिरेखांच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक आणि भावनिक विषय प्रेक्षकांसमोर मांडले. त्यांच्या अभिनयाने कन्नड चित्रपटसृष्टीतील कलात्मक चित्रपटांच्या परंपरेलाही समृद्ध केले.

'मालगुडी डेज' या लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिकेतील त्यांचे कामही विशेष उल्लेखनीय आहे. आर. के. नारायण यांच्या साहित्यविश्वावर आधारित या मालिकेने भारतीय प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. छोट्या शहरातील साधे जीवन, माणसांमधील नातेसंबंध आणि दैनंदिन जगण्यातून उलगडणारे भावविश्व या मालिकेतून प्रेक्षकांसमोर आले. अनंत नाग यांच्या सहज अभिनयामुळे या कथांना अधिक जिवंतपणा प्राप्त झाला. चित्रपटांबरोबरच दूरचित्रवाणीच्या माध्यमातूनही त्यांनी प्रेक्षकांच्या अनेक पिढ्यांशी नाते जोडले.

कलाकाराच्या यशाचे मोजमाप केवळ त्याने मिळविलेल्या पुरस्कारांवरून करता येत नाही. त्याने आपल्या कलेतून किती काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविले, किती विविध भूमिका साकारल्या आणि पुढील पिढीतील कलाकारांना किती प्रेरणा दिली, यालाही महत्त्व असते. अनंत नाग यांच्या कारकिर्दीत या सर्व बाबींचा सुंदर संगम दिसतो. त्यांच्या अभिनयाचा प्रवास हा एका कलाकाराच्या वैयक्तिक यशाचा प्रवास नसून भारतीय चित्रपटसृष्टीतील बदलत्या प्रवाहांचा आणि कलात्मक समृद्धीचा प्रवास आहे.

अनंत नाग यांच्या कलागुणांना यापूर्वीही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांना पाच फिल्मफेअर पुरस्कार, पाच कर्नाटक राज्य सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार आणि कर्नाटक राज्याचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला आहे. २०२५ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. आता दादासाहेब फाळके पुरस्काराच्या रूपाने त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेला राष्ट्रीय स्तरावर आणखी एक महत्त्वपूर्ण मान्यता मिळत आहे.

दादासाहेब फाळके पुरस्काराचे महत्त्व केवळ त्याच्या प्रतिष्ठेमध्ये नाही, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या उभारणीत आणि विकासात योगदान देणाऱ्या कलाकारांच्या कार्याची दखल घेण्यात आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार चित्रपट क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाचा गौरव करतो. चित्रपट निर्मितीच्या विविध अंगांमधून भारतीय सिनेमाला समृद्ध करणाऱ्या कलावंतांसाठी हा पुरस्कार प्रेरणादायी मानला जातो.

अनंत नाग यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने कन्नड चित्रपटसृष्टीसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे. यापूर्वी ज्येष्ठ अभिनेते डॉ. राजकुमार यांना १९९५ मध्ये हा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर हा सन्मान मिळविणारे अनंत नाग हे कन्नड चित्रपटसृष्टीतील दुसरे अभिनेते ठरले आहेत.

आजच्या चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञान, भव्य निर्मिती, प्रसिद्धी आणि व्यावसायिक गणितांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या सर्व बदलांमध्ये अभिनयातील प्रामाणिकपणा, व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास आणि कलेप्रती असलेली निष्ठा यांचे महत्त्व कायम आहे. अनंत नाग यांची कारकीर्द हेच अधोरेखित करते. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचण्यासाठी केवळ मोठ्या पडद्यावरील भव्य उपस्थितीची गरज नसते, तर आपल्या कामातून प्रेक्षकांच्या मनात विश्वास निर्माण करावा लागतो. अनंत नाग यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत हा विश्वास संपादन केला आहे.

एकूणच, अनंत नाग यांना जाहीर झालेला दादासाहेब फाळके पुरस्कार हा त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा, अभिनयातील सहजतेचा आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील अमूल्य योगदानाचा गौरव आहे. त्यांच्या यशातून नवोदित कलाकारांना एक महत्त्वाचा संदेश मिळतोकलेशी प्रामाणिक राहून, सातत्याने मेहनत करून आणि प्रत्येक भूमिकेला न्याय देऊनच कलाकार आपला ठसा काळाच्या पटलावर उमटवू शकतो. अनंत नाग यांचा प्रवास हा अशाच समर्पित कलासाधनेचा प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांच्या या सन्मानामुळे भारतीय चित्रपटसृष्टीतील एका ज्येष्ठ आणि प्रतिभावान कलाकाराच्या कार्याचा गौरव झाला आहे.

# बाप्पा विघ्नहर्ता !

थाटात येतो
राजा सारखा बसतो,
भक्तांकडे पाहून
गालात हसतो...

पाहताच बाप्पाला
येतो आनंदाचा पूर ,
ढोल ताशा नगाऱ्याचे
गगनाला भिडतात सूर...

थोड्याच दिवसांसाठी बाप्पा
भक्तांना भेटायला येतो,
वर्षभराचा दुरावा एका
क्षणात दूर करतो...

नाजूक त्याचे डोळे
शेला असतो भरजरी,
हिरे जडित मुकुट
पितांबर त्याचा भारी...

वाजत गाजत बाप्पा
मखरात येऊन बसतो,
भक्तांच्या मनात एक
वेगळाच उत्साह दाटतो...

सारा परिसर झगमगतो
लाईट तोरणे सजतात
बाप्पाच्या मंडपात
आरतीचे सूर उमटतात

बाप्पाच्या आगमनाचा
सोहळा रंगतो छान
बाप्पा विघ्नहर्त्याची
वेगळीच असते शान...

अशा आमच्या बाप्पाची
रंगत असते न्यारी,
भक्तांच्या गर्दीतून निघते
बाप्पा विघ्नहर्त्याची स्वारी...

असा आमचा बाप्पा
सकळ विघ्नहर्ता,
तोच सुखकर्ता
तोच दुःखहर्ता ...!

**ज्योती रावराणे,**
कांजुरमार्ग, मुंबई

# संघर्ष अटळ आहे

संस्कृतीच इथली
माणूसवैरी आहे
गाव असो की, शहर
माणूस माणसापासून दूर आहे
माणूस माणसाचा वैरी आहे
सावधान बांधवांनो,
दबा धरून बसलेत शिकारी
तुम्हांला पकडण्यासाठी
संधी मिळताच
तुमचे पंख छाटण्यासाठी
बाबांचा नुसताच
बोलबाला आहे
करणीत त्यांच्या श्रीराम आहे
बांधवांनो,
माणूस वैरी संस्कृतीचा
धोका अजून टळलेलाच नाही
बाबांचा संदेश
विसरून चालणार नाही
विखुरलेले सारे संघटित व्हा
समतेसाठी संघर्ष करा.

**–प्रा. तुकाराम गायकवाड**
नांदेड

# नांदेड विभागात 'व्यापक स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानास सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय रेल्वेने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' अभियान हाती घेतले असून, यावर्षीची संकल्पना 'स्वच्छतेत सहभाग; स्वच्छ भारत, विकसित भारत' अशी आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी विभागीय कार्यालय संकुल, नांदेड येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. यावेळी स्वच्छता तसेच पर्यावरणीय जबाबदारीप्रती नांदेड विभागाची कटिबद्धता अधोरेखित करण्यात आली.

या प्रसंगी अप्पर विभागीय रेल्वे व्यवस्थापक सी. एच. कल्याण राजू तसेच विभागातील विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

स्वच्छता ही सेवा अभियानाचा समारोप २ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात येणार असून, महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस सेवा दिवस अर्थात सामुदायिक सेवा दिन म्हणून साजरा करण्यात येणार



आहे. याशिवाय भारतीय रेल्वेकडून स्वच्छता पंधरवडा २०२६ हा १ ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत तसेच विशेष अभियान ६.० हे २ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

स्वच्छता ही सेवा २०२६ आणि स्वच्छता पंधरवडा २०२६ अंतर्गत रेल्वे परिसंस्थेमध्ये जनसहभाग, स्वच्छता आणि सातत्यपूर्ण स्वच्छता उपक्रमांना बळकटी देण्यावर भर दिला जाणार आहे. विशेष अभियान ६.० अंतर्गत स्वच्छतेचे संस्थात्मक स्वरूपात दृढीकरण, प्रलंबित बाबींचा निपटारा, स्वच्छता आणि जागा व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून, यावर्षी ई-कचऱ्याचे प्रभावी संकलन, वर्गीकरण आणि विल्हेवाट यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

स्वच्छता ही सेवा अभियानाच्या कालावधीत रेल्वे स्थानके, रेल्वे गाड्या आणि रेल्वे कार्यालयांमधील स्वच्छता अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकाराव्यात आणि त्या सातत्याने जपाव्यात यासाठी व्यापक जनजागृती अभियानही राबविण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना कामले यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वच्छता ही सेवा अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे तसेच दैनंदिन कामकाजात स्वच्छतेची शपथ प्रत्यक्षात आचरणात आणण्याचे आवाहन केले. स्वच्छता ही केवळ विशेष अभियानांपुरती मर्यादित न राहता ती वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनाचा नियमित भाग आणि सवय बनली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपल्या कुटुंबियांमध्ये, शेजारी तसेच समाजामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचे आणि रेल्वे परिसर तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले.

## तैलिक समाज संघटनेच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी गणेश यशवंतकर यांची निवड

**भोकर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेची विभागीय बैठक शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६



रोजी नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र प्रांतिक तैलिक संघटनेच्या नांदेड जिल्हा अध्यक्ष (ग्रामीण)पदी भोकर नगर परिषदचे नगरसेवक प्रतिनिधी गणेश यशवंतकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नांदेड शहर अध्यक्षपदी ओमप्रकाश वाघमारे, तर कार्याध्यक्षपदी संतोष ठमके यांची निवड झाली.

बैठकीस महाराष्ट्र प्रांतिक तैलिक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष संजयबापू विभुते हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय अध्यक्ष मधुकरराव राऊत होते. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना संजयबापू विभुते यांनी समाजाने शाखाभेद विसरून एकत्र येण्याचे आवाहन केले. तरुणांनी शिक्षण, व्यापार व उद्योग क्षेत्रात प्रगती करावी आणि समाजातील गरजू बांधवांना संघटनेच्या माध्यमातून मदत करावी, असे त्यांनी सांगितले.

## पेरियार रामास्वामी नायकर, वीरांगणा भीमाबाई होळकर, क्रांतीवीर उमाजी नाईक जयंती दिनी आरोग्य शिबीर संपन्न



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालय (होळकर नगर, सिडको, नांदेड) येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तसेच पेरियार ई. व्ही. रामास्वामी नायकर, वीरांगना भीमाबाई होळकर आणि क्रांतीवीर उमाजी नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संभाजी धुळगंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

कार्यक्रमाचे उद्घाटक प्रबोधनकार गोविंदराम शूरनर यांनी आपल्या म ार्गदर्शनात भारताला स्वातंत्र्य मिळावे आणि समाजात समता यावी म्हणून महापुरुषांनी मोठा लढा दिला. मात्र, आधुनिक काळात चंगळवाद वाढल्याने माणूस विविध आजारांना बळी पडत आहे. त्यामुळे निरोगी समाजासाठी गाव पातळीवर अशा आरोग्य शिबिरांची नितांत गरज आहे, असे मत व्यक्त केले.

प्रमुख वक्ते डॉ. शंकर स्वामी वडेपुरीकर यांनी स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची दारे खुली झाली असली तरी आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. चुकीच्या जीवनशैलीम ुळे अनेक आजार बळावत आहेत. आळस झटकून घरगुती उपाय आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली स्वीकारल्यास दवाखान्याची गरज भासणार नाही, असे सांगत विविध सोपे घरगुती उपाय सुचवले.

अध्यक्षीय भाषणात संभाजी पाटील म्हणाले की, डॉ. वडेपुरीकर यांनी सांगितलेले अनुभव आणि उपाय आपल्या दैनंदिन जीवनात कृतीत आणून प्रत्येकाने निरोगी आयुष्य जगावे.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून धोंडीबा मोरे, सतीश शिंदे, उत्तम शूरनर, विलास जंगले, महाजन तुपेकर, पांडुरंग धुळगंडे, अशोक खटके उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाला सूर्यकांत गुंडाळे, बाबूराव येळगे, जनार्दन कांबळे, मृणाली शूरनर, सविता हेळगिरे, सावित्रा शूरनर, धोंडूताई मुसळे, वनिता राठोड, कांबळेताई, गौरी देवकते, पद्मावती येळगे, शांताबाई शूरनर, गंगासागर खटके, रोहिणी पूर्णाळे, प्रतीक्षा राठोड, नेहा राठोड आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईप्रसाद देवकाते यांनी केले, तर आभार ग्रंथपाल मदनेश्वरी शूरनर यांनी मानले.

## इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालयात 'हिंदी दिवस' उत्साहात साजरा; गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके वाटून उपक्रमाचे कौतुक



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यात हिंदी भाषेचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे प्रतिपादन यशवंत वरिष्ठ महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. संदीप पाईकराव यांनी केले. शारदा भवन शिक्षण संस्थेद्वारे संचालित इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे हिंदी विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर रोजी 'हिंदी दिवस' सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. रमेश नांदेडकर उपस्थित होते. सांस्कृतिक विभागप्रमुख सौ. झेड. एस. फाजगे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एम. देशमुख यांनी करून दिला. या प्रसंगी प्रमुख अतिथी आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिंदी वार्षिक अंक 'उमंग' चे विमोचन करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेवर आधारित भाषणे, हिंदी भाषा गीते, गझल आणि हिंदी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारे नाटक सादर केले. या विविध मनमोहक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. रमेश नांदेडकर यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात पुष्पगुच्छांऐवजी गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांची भेट देण्यात आली. या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे अतिथींच्या सत्कारासाठी अनावश्यक फुलांवर खर्च न करता त्या रक्कमेतून गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली.

## राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे त्वरित न हटविल्यास आमरण उपोषण; संघर्ष समितीचा इशारा

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट शहर आणि तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग १६१ ए च्या कडेला असलेली सर्व अतिक्रमणे त्वरित हटवण्यात यावीत,अन्यथा राष्ट्रीय महामार्ग रस्ता रुंदीकरण संघर्ष समितीच्यावतीने आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे १३ एप्रिल २०२६ चे निर्देश, मुख्य सचिव कार्यालयातील २२ जुलै २०२६ ची बैठक आणि २५ ऑगस्ट २०२६ चे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश यांनुसार महामार्गावरील अतिक्रमणे तातडीने हटवण्याचे स्पष्ट आदेश आहेत.त्यानुसार कोठारी ते गोकुंदा, अशोकस्तंभ, जिजामाता चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते बस स्टॅण्ड आणि अय्याप्पा स्वामी मंदिरापर्यंत महामार्गाला लागून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली आहेत. संपूर्ण मराठवाड्यात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असताना, किनवट शहर व तालुक्यात मात्र अतिक्रमणधारकांना साधी नोटीससुद्धा बजावण्यात आलेली नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

क्रीडा संकुल, तहसील कार्यालय, नगर परिषद, दिवाणी न्यायालय, जिल्हा परिषद व्यापारी संकुल इत्यादींनी महामार्गाच्या मध्यभागापासून १८ मीटर अंतर सोडून बांधकामे केली असताना, इतर अनधिकृत बांधकामे आणि बसस्टॅण्डजवळील टपऱ्या भाड्याने देऊन अतिक्रमण केले जात आहे. सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार अतिक्रमणधारकांना त्वरित नोटिसा बजावून रस्ता मोकळा न केल्यास २ ऑक्टोबरपासून उपविभागीय कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## मसापच्या जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. विठ्ठलराव कदम



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या तिसऱ्या जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी माजी प्राचार्य डॉ. विठ्ठलराव कदम यांची निवड करण्यात आली आहे.

हे साहित्य संमेलन १० ऑक्टोबर रोजी लोहा येथील डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या परिसरात आयोजित करण्यात आले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे संमेलन पार पडणार आहे. अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देविदास फुलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मसाप शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. डॉ. विठ्ठलराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनात प्रकट मुलाखत, शेतीविषय मार्गदर्शन, कथाकथन, काव्य वाचन होणार आहे.

या बैठकीस मसापचे कार्यवाह प्रा. महेश मोरे, उपाध्यक्ष दिगंबर कदम, श्रीनिवास मस्के, राम तरटे, अनुजा डोईफोडे, प्रा. संजय जगताप, प्रा. धाराशिव शिराळे, प्रा. ललिता बोकारे, ॲड. विजयकुमार भोपी, निजाम गवंडगावकर, मंगल फुलारी, बालाजी भागानागरे यांच्यासह मसापचे पदाधिकारी व साहित्यप्रेमी उपस्थित होते.

## परवानानगरमध्ये आज 'निषाद' ची भक्तीसंध्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील परवानानगर बँक कॉलनीतील गणेश मंदिरात रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता निषाद संगीत विद्यालयाच्या संचाच्या भक्तीसंगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे सेवानिवृत्त उपायुक्त रत्नाकर वाघमारे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात निषाद संगीत विद्यालयाचे संचालक सुशांत पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरजीतसिंग पुजारी, अंजली जोशी, पूजा नाईक, सुनील गुरू, गौतम रनुवते, गोरबेले, सचिन कांबळे, अनिकेत कुलकर्णी आदीजण भक्तीगीते सादर करणार आहेत. गजानन कुलकर्णी हे तबला वादन तर महेश क्यातमवार हे बासरी वादन करणार आहेत. संगीत रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून भक्तीसंध्येचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन भुजंगराव कदम, विनोद कापसीकर, गजानन डोईफोडे, लक्ष्मीकांत पांडे यांनी केले आहे.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन विविध उपक्रमांनी साजरा












**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात विविध संस्था, विद्यालय, महाविद्यालयांमध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजरोहण करण्यात आला. यासह विविध सामाजिक उपक्रम राबवून मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**गोदावरी विद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा**

गोदावरी विद्यालयातील ज्येष्ठ सेविका पोहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून एक नवा आदर्श घालून देण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही १७ सप्टेंबर रोजी विद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांना आणि थोर नेत्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक प्रा. पौळ, व्यवस्थापकीय संचालक आर. एस. पाटील उपस्थित होते. शाळेतील मोठ्या पदाधिकाऱ्यांऐवजी, विद्यालयाची अहोरात्र सेवा करणाऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी 'सेविका पोहरे' यांना ध्वजारोहणाचा मुख्य मान देण्यात आला. त्यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण पार पडले.

सेविका पोहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून शाळेने 'श्रमप्रतिष्ठा' आणि 'समानता' हाच खरा संदेश दिल्याचे पौळ यांनी नमूद केले. यावेळी पोहरे यांचा विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कारही करण्यात आला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. होपळे, प्राचार्या डॉ. वैजयंती कस्तुरे, प्राचार्य नितीन हाटकर, समन्वयक डी. जी. पाटील, पर्यवेक्षक नितीन बिरादार, प्रा. संदीप पावडे, कार्यालयीन अधिक्षिका संध्या वडजे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली तर आभार सहशिक्षिका नूतन आंबेकर यांनी मानले.

**किनवटमध्ये मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन उत्साहात**

**किनवट (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त किनवट येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी बी. सरवनन यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये तसेच शहरातील विविध ठिकाणी विविध उपक्रमांचे आयोजन करून मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले. ध्वजारोहणानंतर स्वरनिनाद संगीत क्लास, गोकुंदाच्या संस्थापिका संगीत विशारद आम्रपाली वाठोरे-कांबळे यांनी तबला विशारद प्रा. शिवकुमार कोंडे यांच्या तबला साथीने राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्यगीत आणि मराठवाडा गीत सादर केले.

यावेळी सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद जाधव व तहसील कार्यालयात पोलीस उपनिरीक्षक नितेश लेंगुळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दलाच्यावतीने मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम कानिंदे यांनी केले. राम बुसमवार यांनी आभार मानले.

**मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वा. सैनिकांच्या वारशांचा सन्मान**

मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या वारसांचा यावेळी सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदार मुक्ताबाई निवृत्ती सावते यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार, नायब तहसीलदार मोहम्मद रफीक, रामेश्वर मुंडे, चंद्रशेखर सहारे, बालाजी फोले, निलेश राठोड, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती, शिवराज राघू मामा, रामरेड्डी आईटवार, निवृत्त नायब तहसीलदार भाऊराव जाधव, सुरेश जाधव, आशा कदम, संदीप निखाते, शेख मुजाहिद यांच्यासह माजी सैनिक बळीराम कुडमेथे, तुकाराम माशीदवार, अशोक सिडाम, साहेबराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

**मुदखेड शहरात विविध शासकीय कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा**

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड शहरामध्ये १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तहसीलच्या प्रांगणामध्ये तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी स्वातंत्र्य सैनिक व अधिकारी, कर्मचारी, राजकीय पक्षाचे नेते, पत्रकार, नागरिक यांची प्रमुख उपस्थिती होती. मुदखेड नगरपरिषद कार्यालय येथे नगराध्यक्ष विश्रांती कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुख्याधिकारी शुभम वाठोरे व नगरसेवक व कर्मचारी यांची उपस्थिती होती. मुदखेड पंचायत समिती कार्यालय येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सहायक गटविकास अधिकारी हातमोडे व विस्तार अधिकारी, कार्यालयातील कर्मचारी यांची उपस्थिती होती. तालुका कृषी कार्यालय येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तालुका कृषी अधिकारी अमर ज्योती गच्चे यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कर्मचाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

**डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा**

**लोहा (प्रतिनिधी)–** डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ०७.५० वाजता मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वाराती मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी रामानंद तीर्थ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी दिगंबरराव क्षीरसागर (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ) व प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक शंकर वाडेवाले आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण प्रमुख पाहुणे तसेच विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत, राज्यगीत तसेच विद्यापीठ गीत यांचे सामूहिक पठण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. एस. एम. आंबोरे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे महत्व सांगितले व मार्गदर्शन केले. डॉ. केशव इंगोले (प्राचार्य, बी. एड. कॉलेज, लोहा) यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

या कार्यक्रमास डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. नरेंद्र पत्रे, विभागप्रमुख प्रा. प्रज्ञा भोसले, प्रा. गणपतराव हिलाल (मुख्याध्यापक, स्वर्गीय कै. आबासाहेब पाटील माध्यमिक विद्यालय लोहा) तसेच डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व स्वामी विवेकानंद ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**अर्धापूर पोलीस ठाण्यात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त रक्तदान शिबीर**

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून अर्धापूर पोलीस ठाण्याच्या वतीने गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या भावनेतून अनेक रक्तदात्यांनी या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून रक्तदान केले.

पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर पार पडले. यावेळी सपोनि भास्कर कांबळे, उपनिरीक्षक सुरेश भोसले, पोउनि अनिता राठोड व भीमराव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पोलीस पाटील अवधूत क्षीरसागर, आनंदराव इंगळे, सचिन दिलमाडे आणि शिवाजी चव्हाण यांनीही या कार्यक्रमास हजेरी लावत महिला पोलीस कर्मचारी इंदू गवळी, पोलीस पाटील सचिन देलमाडे यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी जमादार एस. के.ढवळे, संभाजी शिवभक्त, महेंद्र डांगे, इंदू गवळी, प्रदीप जमदाडे, हेमंत बिचकुले, सुभाष मुंगल आदींनी विशेष परिश्रम घेतले. या सामाजिक उपक्रमाबद्दल पोलीस प्रशासनाचे परिसरातून कौतुक होत आहे.

**मुक्तीसंग्राम दिनानिमित्त सिडको मनपा क्षेत्रीय कार्यालयात ध्वजारोहण**

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी सकाळी ७ वाजता उपायुक्त गंगाधर ईरलोड यांच्या हस्ते तर सिडको कार्यालयात विकास अधिकारी कपिल राजपूत यांच्या हस्ते ७.३५ ध्वाजारोहण करण्यात आले.

यावेळी महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती सौ. निरजंना लांडगे, सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, स्वच्छता निरीक्षक किशन वाघमारे, अर्जुन बांगडे, कार्यालयीन कर्मचारी सौ. अर्चना जोंधळे, मीना अडबलवार, विठ्ठल आंबटवार, बालाजी लोहगावकर, सूर्यवंशी, वसुली पर्यवेक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर, नारायण आठवले व कर्मचाऱ्यांच्यासह वसुली लिपीक मारोती सारंग, मालू एनफळे, उत्तम जोंधळे, नथुराम चवरे, विवेकानंद लोखंडे, प्रकाश दर्शने, रमेश यशवंतकर यांच्यासह मातृ आरोग्य केंद्र येथील परिचारिका, आशा वर्कर्स व पत्रकार उपस्थित होते.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# 30, 100 की 300 Mbps... घरासाठी किती इंटरनेट स्पीड पुरेसा?

**घरात Wi-Fi किंवा ब्रॉडबँड कनेक्शन घेताना सर्वांत मोठा प्रश्न असतो तो इंटरनेटच्या वेगाचा. 30 Mbps, 100 Mbps की 300 Mbps यापैकी नेमका कोणता प्लॅन घ्यावा, याबाबत अनेकदा संभ्रम निर्माण होतो. गरजेपेक्षा कमी वेगाचा प्लॅन घेतल्यास व्हिडिओ बफरिंग, स्लो ब्राउझिंग आणि डाउनलोडिंगचा त्रास होऊ शकतो. दुसरीकडे, गरज नसताना अतिजास्त वेगाचा महागडा प्लॅन घेणे म्हणजे अनावश्यक खर्च ठरू शकतो. त्यामुळे इंटरनेटचा वापर किती जण करणार आहेत, कोणत्या कामांसाठी करणार आहेत, तसेच डाउनलोड, अपलोड आणि पिंग म्हणजेच लेटन्सी किती आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.**




» Mbps आणि MBps मधील फरक समजून घ्या : इंटरनेटचा वेग सामान्यतः Mbps (मेगाबिट्स प्रति सेकंद) मध्ये मोजला जातो. मात्र, संगणक किंवा मोबाईलवर डाउनलोड होणाऱ्या फाइलचा आकार MB (मेगाबाइट्स) मध्ये दिसतो. महत्त्वाचे म्हणजे १ बाइट = ८ बिट्स. त्यामुळे इंटरनेट कनेक्शनचा Mbps मधील वेग समजून घेताना त्याला ८ ने भागल्यास अंदाजे MBps मधील डाउनलोड वेग मिळतो. उदाहरणार्थ, 300 Mbps कनेक्शनचा सैद्धांतिक डाउनलोड वेग सुमारे 37.5 MBps इतका होतो. मात्र, प्रत्यक्ष डाउनलोड वेग नेटवर्कची स्थिती, सर्व्हर, Wi-Fi, राउटर आणि इतर घटकांमुळे कमी-जास्त होऊ शकतो. तसेच, 300 Mbps कनेक्शनवर 5 GB फाइल डाउनलोड करण्यास सैद्धांतिकदृष्ट्या सुमारे 2 मिनिटे 13 सेकंद लागू शकतात; प्रत्यक्ष वेळ परिस्थितीनुसार बदलू शकतो.

» डाउनलोडइतकाच अपलोड वेगही महत्त्वाचा : फक्त डाउनलोड स्पीड पाहून इंटरनेट प्लॅन निवडणे योग्य नाही. अपलोड स्पीडदेखील महत्त्वाचा आहे. विशेषतः व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, ऑनलाइन क्लास, क्लाउडवर मोठ्या फाइल्स अपलोड करणे, कंटेंट तयार करणे किंवा लाइव्ह स्ट्रीमिंग यासाठी चांगला अपलोड वेग आवश्यक असतो. पारंपरिक केबल ब्रॉडबँडमध्ये डाउनलोड आणि अपलोड वेग वेगवेगळा असू शकतो. अनेक फायबर कनेक्शनमध्ये मात्र दोन्ही दिशेचा वेग तुलनेने समान किंवा जवळपास समान असू शकतो. प्लॅन घेताना ही बाब तपासणे फायदेशीर ठरते.

» 'Ping' म्हणजे नेमके काय? : इंटरनेट वापरताना केवळ Mbps महत्त्वाचा नसतो. Ping किंवा Latency म्हणजे तुमच्या उपकरणातून सर्व्हरपर्यंत डेटा जाऊन प्रतिसाद परत येण्यासाठी लागणारा वेळ. ऑनलाइन गेमिंग, व्हिडिओ कॉलिंग आणि रिअल-टाइम ॲप्लिकेशन्ससाठी कमी लेटन्सी महत्त्वाची असते. त्यामुळे जास्त Mbps असूनही पिंग जास्त असल्यास गेमिंग किंवा व्हिडिओ कॉलमध्ये विलंब जाणवू शकतो. इंटरनेट कनेक्शनची डाउनलोड-अपलोड स्पीड आणि पिंग तपासण्यासाठी Speedtest.net किंवा Cloudflareसारख्या स्पीड-टेस्ट साधनांचा वापर करता येतो.

» मग 30, 100 की 300 Mbps? : याचे उत्तर तुमच्या वापरावर अवलंबून आहे. एक-दोन व्यक्तींचा सामान्य वापर असेल तर 100 Mbps पुरेसा ठरू शकतो. अनेक सदस्यांचे घर, वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन शिक्षण आणि मोठ्या फाइल्सचा वापर असल्यास 300 Mbps अधिक योग्य ठरू शकतो. तर अनेक उपकरणांवर एकाच वेळी उच्च गुणवत्तेचे स्ट्रीमिंग, गेमिंग आणि मोठे डेटा ट्रान्सफर होत असल्यास त्यापेक्षा अधिक वेगाची गरज भासू शकते. थोडक्यात, फक्त 'जास्त Mbps म्हणजे चांगले इंटरनेट' असे समीकरण नाही. आपल्या घरातील वापर, वापरकर्त्यांची संख्या, अपलोड स्पीड, पिंग आणि राउटरची क्षमता लक्षात घेऊन प्लॅन निवडणे अधिक महत्त्वाचे आहे.

## कोणत्या कामासाठी किती इंटरनेट स्पीड?

» इंटरनेटचा योग्य प्लॅन निवडताना आपल्या वापराचा प्रकार सर्वांत महत्त्वाचा आहे.

» ऑनलाइन व्हिडिओ पाहण्यासाठी : 1080p गुणवत्तेतील व्हिडिओ स्ट्रीमिंगसाठी सुमारे 5 Mbps आणि 4K स्ट्रीमिंगसाठी सुमारे 15 Mbps वेग आवश्यक असू शकतो. मात्र, एकाच कनेक्शनवर अनेक उपकरणे वापरली जात असल्यास अधिक वेगाची गरज भासू शकते.

» एक-दोन व्यक्तींच्या सामान्य वापरासाठी : ब्राउझिंग, सोशल मीडिया, ऑनलाइन व्हिडिओ, व्हिडिओ कॉल आणि दैनंदिन कामांसाठी 100 Mbps कनेक्शन अनेक घरांसाठी पुरेसे ठरू शकते.

» वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन क्लास आणि मोठ्या फाइल्ससाठी : घरातील अनेक व्यक्ती एकाच वेळी इंटरनेट वापरत असतील, ऑनलाइन बैठकांबरोबर मोठ्या फाइल्स डाउनलोड किंवा अपलोड कराव्या लागत असतील, तर 300 Mbpsचा प्लॅन अधिक उपयुक्त ठरू शकतो.

» जास्त वापर असलेल्या घरांसाठी : एकाच वेळी अनेक जण 4K व्हिडिओ स्ट्रीमिंग, ऑनलाइन गेमिंग आणि मोठ्या प्रमाणावर डेटा ट्रान्सफर करत असतील, तर 500 Mbps किंवा त्यापेक्षा अधिक वेगाचा प्लॅन विचारात घेता येऊ शकतो.

## जास्त स्पीड असूनही इंटरनेट स्लो का वाटते?

» तुमच्या प्लॅनचा वेग जास्त असूनही प्रत्यक्ष वापरात इंटरनेट अपेक्षेइतके वेगवान वाटत नसेल, तर त्यामागे अनेक कारणे असू शकतात.

» राउटरपासून उपकरणाचे जास्त अंतर

» घरातील जाड भिंती किंवा अन्य अडथळे

» जुना किंवा कमी क्षमतेचा राउटर

» इंटरनेट सेवा पुरवठादाराच्या नेटवर्कवरील तांत्रिक अडचणी

» VPNचा वापर

» एकाच वेळी अनेक उपकरणांवर मोठ्या प्रमाणात इंटरनेट वापर

» तुमचा राउटर किंवा मॉडेम संबंधित हाय-स्पीड बँडविड्थला समर्थन देत नसेल, तर महागडा आणि वेगवान प्लॅन घेतल्यानंतरही त्याचा पूर्ण फायदा मिळणार नाही.

# UPI शिवायही करता येणार सहज डिजिटल पेमेंट; हे 5 पर्याय ठरतील उपयुक्त!

**आजच्या काळात रोख पैशांऐवजी डिजिटल पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यात UPI हा सर्वाधिक लोकप्रिय पर्याय ठरला आहे. मात्र, UPI व्यतिरिक्तही काही डिजिटल पद्धतींद्वारे सहज आणि सुरक्षितपणे पेमेंट करता येते. डिजिटल रुपया, डेबिट-क्रेडिट कार्डचे NFC अर्थात 'टॅप टू पे' वैशिष्ट्य, मोबाईलमध्ये सेव्ह केलेले कार्ड, स्मार्टवॉच किंवा स्मार्ट रिंग यांसारखे पर्याय उपलब्ध आहेत.**




» डिजिटल रुपयाचा वापर करा : UPI प्रमाणे डिजिटल व्यवहार करण्यासाठी डिजिटल रुपया हा पर्याय वापरता येतो. साध्या भाषेत सांगायचे तर, तो आपल्या खिशातील नोटा आणि नाण्यांचे डिजिटल रूप मानता येईल. डिजिटल रुपये मोबाईलमधील वॉलेटमध्ये साठवले जातात. हा खासगी क्रिप्टोकरन्सीचा प्रकार नसून भारतीय रिझर्व्ह बँकेकडून जारी करण्यात आलेली डिजिटल चलनव्यवस्था आहे. डिजिटल रुपया डिजिटल लेजर तंत्रज्ञानावर आधारित आहे. त्याची रचना पारंपरिक ऑनलाइन बँक व्यवहारांपेक्षा वेगळी आहे. या पद्धतीत डिजिटल रक्कम एका वॉलेटमधून दुसऱ्या वॉलेटमध्ये हस्तांतरित केली जाऊ शकते. या पद्धतीचा आणखी एक फायदा म्हणजे व्यवहारांसाठी मध्यस्थ शुल्क किंवा सुविधा शुल्क आकारले जात नाही, असा दावा करण्यात आला आहे. वापरासाठी संबंधित बँकेचे Digital Rupee ॲप डाउनलोड करून वॉलेट सक्रिय करावे लागू शकते. त्यानंतर डिजिटल रक्कम या वॉलेटमध्ये ठेवता येते. विशेष म्हणजे, डिजिटल रुपयाद्वारे QR कोड स्कॅन करूनही पेमेंट करता येते.

» कार्डच्या NFC सुविधेचा वापर : तुमच्या डेबिट किंवा क्रेडिट कार्डवर NFC (Near Field Communication) सुविधा उपलब्ध असल्यास कार्ड मशीनवर स्वाइप करण्याऐवजी केवळ टॅप करून पेमेंट करता येते. ही पद्धत वापरण्यास सोपी असून, व्यवहाराच्या प्रकारानुसार प्रत्येक वेळी पिन टाकण्याची आवश्यकता नसू शकते. संबंधित कार्ड आणि POS मशीन NFC व्यवहाराला समर्थन देत असल्यास ही सुविधा वापरता येते. या पद्धतीत कार्ड क्रमांक किंवा CVV दुकानदाराला सांगण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे प्रत्यक्ष कार्ड तपशील शेअर न करता व्यवहार करता येतो. काही व्यवहारांमध्ये कार्डच्या संपर्करहित पेमेंटची मर्यादा लागू असू शकते. त्यामुळे व्यवहार करण्यापूर्वी आपल्या बँकेच्या आणि कार्डच्या नियमांची माहिती घेणे महत्त्वाचे आहे.


» मोबाईलमध्ये कार्ड सेव्ह करा : प्रत्येक वेळी डेबिट किंवा क्रेडिट कार्ड सोबत बाळगण्याची गरज भासू नये, यासाठी कार्ड मोबाईलमधील समर्थित डिजिटल वॉलेटमध्ये सुरक्षितपणे सेव्ह करता येते. उदाहरणार्थ, Samsung Wallet किंवा Google Wallet सारख्या सेवांमध्ये पात्र कार्ड डिजिटल स्वरूपात जोडता येते. कार्डचे टोकन स्वरूपातील तपशील वापरून मोबाईलला POS मशीनजवळ नेऊन 'टॅप' करून पेमेंट करता येते. यामुळे प्रत्यक्ष कार्ड जवळ नसतानाही, संबंधित मोबाईल आणि पेमेंट सेवा समर्थित असल्यास व्यवहार करणे शक्य होते.

» स्मार्टवॉच आणि स्मार्ट रिंगचाही पर्याय : मोबाईल किंवा कार्ड जवळ नसतानाही काही उपकरणांच्या मदतीने डिजिटल पेमेंट करता येते. पेमेंट सुविधेला समर्थन देणाऱ्या स्मार्टवॉच आणि स्मार्ट रिंगमध्ये कार्डची माहिती सुरक्षित पद्धतीने जोडता येते. त्यानंतर संबंधित उपकरण POS मशीनजवळ नेऊन संपर्करहित पद्धतीने पेमेंट करता येते. मात्र, ही सुविधा सर्व स्मार्टवॉच किंवा स्मार्ट रिंगमध्ये उपलब्ध असेलच असे नाही. उपकरण, बँक, कार्ड आणि पेमेंट सेवेचे समर्थन आवश्यक असते.

## IMPS आणि NEFT हेही पर्याय

UPIप्रमाणे क्षणार्धात पेमेंट करण्यासाठी IMPS आणि NEFT तितके सोपे पर्याय नसले तरी मोठ्या रकमेच्या डिजिटल व्यवहारांसाठी त्यांचा वापर करता येतो. यासाठी प्राप्तकर्त्याचा बँक खाते क्रमांक आणि IFSC कोड यांसारखी माहिती आवश्यक असते. IMPSद्वारे सामान्यतः तातडीने निधी हस्तांतरित करता येतो, तर NEFT व्यवहारांच्या प्रक्रियेचे वेळापत्रक आणि क्रेडिटचा कालावधी संबंधित बँकेच्या नियमांवर अवलंबून असतो. त्यामुळे UPI उपलब्ध नसल्यास किंवा मोठी रक्कम बँक खात्यात हस्तांतरित करायची असल्यास IMPS आणि NEFT हेही उपयुक्त डिजिटल पर्याय ठरू शकतात. UPI व्यतिरिक्त डिजिटल पेमेंटचे अनेक पर्याय उपलब्ध असले तरी शुल्क, व्यवहाराची मर्यादा, बँकेचे नियम आणि संबंधित सेवेची उपलब्धता यामध्ये फरक असू शकतो. त्यामुळे व्यवहार करण्यापूर्वी आपल्या बँकेकडून लागू असलेले शुल्क आणि मर्यादा तपासणे आवश्यक आहे.





# रेल्वे रुळांच्या थरथराटातून वीज

## नव्या तंत्रज्ञानामुळे ट्रॅकवरील सेन्सर्सला मिळणार स्वयंपूर्ण ऊर्जा

**रेल्वे रुळांवरून धावणाऱ्या गाडीच्या चाकांमुळे निर्माण होणारी थरथर किंवा कंपन आतापर्यंत ऊर्जा वाया जाण्याचे एक कारण मानले जात होते. मात्र, आता याच कंपनांपासून वीज निर्माण करण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रेल्वे मार्गाच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवणाऱ्या कमी क्षमतेच्या सेन्सर्सना वीजपुरवठा करता येणार आहे.**

» तीन प्रमुख यंत्रणांद्वारे होते वीजनिर्मिती : या प्रणालीमध्ये मुख्यतः कंपन रूपांतरण यंत्रणा, जनरेटर यंत्रणा आणि ऊर्जा साठवण यंत्रणा असे तीन भाग आहेत. रेल्वेची जड गाडी रुळांवरून जात असताना रुळांमध्ये निर्माण होणारी वर-खाली हालचाल विशेष सीझर लिंकेज आणि स्लायडर यंत्रणेच्या साहाय्याने एका दिशेने होणाऱ्या फिरत्या गतीत रूपांतरित केली जाते. या फिरत्या गतीचा वापर करून त्रिफेज जनरेटर वीज निर्माण करतो. त्यानंतर ही वीज रेक्टिफिकेशन आणि फिल्टरिंग प्रक्रियेतून नेऊन सुपरकॅपॅसिटरमध्ये साठवली जाते.


» कार्यक्षमतेची नोंद ७३.३८ टक्के : संशोधकांनी या तंत्रज्ञानाची चाचणी घेतली असून, त्यामध्ये प्रणालीची कार्यक्षमता ७३.३८ टक्के असल्याचे आढळले. चाचणीदरम्यान ७.४४ वॉट इतका कमाल विद्युत उत्पादन क्षमतेचा स्तर नोंदवण्यात आला. या प्रमाणातील वीज लहान इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि कमी ऊर्जा वापरणारे सेन्सर्स चालविण्यासाठी पुरेशी ठरू शकते.

» रेल्वे ट्रॅकच्या देखरेखीत मोठा उपयोग : रेल्वे रुळांची स्थिती, सुरक्षितता आणि त्यामध्ये होणारे बदल यावर लक्ष ठेवण्यासाठी विविध प्रकारचे कमी क्षमतेचे सेन्सर्स वापरले जातात. हे सेन्सर्स सातत्याने कार्यरत ठेवण्यासाठी सध्या लांब वायरिंग करावी लागते किंवा ठराविक कालावधीनंतर बॅटरी बदलावी लागते. कंपनांपासून वीज निर्माण करणारी ही प्रणाली कार्यान्वित झाल्यास सेन्सर्सना स्थानिक पातळीवरच ऊर्जा उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे ते सातत्याने कार्यरत राहून रुळांच्या स्थितीशी संबंधित माहिती प्रत्यक्ष वेळेत (रिअल-टाइम) नियंत्रण कक्षापर्यंत पाठवू शकतील.

» सूर्यप्रकाश किंवा वाऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज नाही : सौर आणि पवन ऊर्जेसारख्या पर्यायी ऊर्जा स्त्रोतांसाठी अनुक्रमे सूर्यप्रकाश आणि वाऱ्याची आवश्यकता असते. मात्र, रेल्वे रुळांवरील ही प्रणाली गाडीच्या हालचालीतून निर्माण होणाऱ्या कंपनांचा वापर करते. रेल्वेगाडी रुळांवरून जात असताना निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे वीज तयार होत राहू शकते. त्यामुळे रेल्वे मार्गावरील सेन्सर्सना ऊर्जा देण्यासाठी ही पद्धत स्वतंत्र आणि स्थानिक ऊर्जा स्त्रोत म्हणून उपयोगी ठरण्याची शक्यता आहे. रुळांवर निर्माण होणारी अन्यथा वाया जाणारी यांत्रिक ऊर्जा उपयोगात आणून रेल्वेच्या रिअल-टाइम देखरेख व्यवस्थेला अधिक स्वयंपूर्ण बनविण्याच्या दिशेने हे तंत्रज्ञान महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

### ट्रेनच्या कंपनांपासून होणार वीजनिर्मिती

आतापर्यंत रेल्वे गाड्या विजेवर धावत होत्या; मात्र आता रेल्वेच्या हालचालीतूनच काही प्रमाणात वीज निर्माण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संशोधकांनी रेल्वे रुळांवर गाडी धावताना निर्माण होणाऱ्या कंपनांचे विद्युत ऊर्जेत रूपांतर करण्याची पद्धत विकसित केली आहे. गाडीचे वजन रुळांवर पडल्याने ते किंचित वर-खाली हालतात. या हालचालीत मोठ्या प्रमाणात यांत्रिक ऊर्जा निर्माण होते. त्यातील काही ऊर्जा उष्णतेच्या स्वरूपात वातावरणात वाया जाते. नव्या तंत्रज्ञानामुळे ही ऊर्जा विद्युत ऊर्जेत रूपांतरित करून वापरता येणार आहे. विशेषतः रेल्वे मार्गाच्या देखरेखीसाठी वापरल्या जाणाऱ्या कमी वीज वापरणाऱ्या सेन्सर्ससाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते.



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# पीक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध -कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा



**नांदेड (प्रतिनिधी) –** मराठवाड्यासह राज्यात अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले असून, पावसात खंड पडल्याने शेती पिकांवर परिणाम झाला आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई व मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. पीक विम्याचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळण्यासाठी मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक व अचूकपणे तातडीने पूर्ण करावेत. या प्रक्रियेत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आयोजित बैठकीत दिले.

नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील आठही जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ऊर्जा, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रामराव वडकुते, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, खासदार संजय जाधव, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार सर्वश्री हेमंत पाटील, अमरनाथ राजूरकर, सईद खान, कैलास पाटील, बाबूराव कदम कोहळीकर, भीमराव केराम, राजेश पाटील, राजू नवघरे, प्रताप पाटील चिखलीकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, उपायुक्त रिता मैत्रेवार, वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होत्या. तर खा. अशोकराव चव्हाण, खा. अजित गोपछडे, खा. ओमराजे निंबाळकर, खा. बजरंग सोनवणे, खा. डॉ. कल्याण काळे यांच्यासह विविध विधानसभा मतदार संघातील आमदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झालेले नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह उपस्थित लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांना जास्तीत-जास्त मदत मिळवून देण्यासाठी आपली मते मांडली.

मराठवाड्यातील ७६ तालुक्यांमध्ये कमी पाऊस व पावसातील खंडामुळे पीक नुकसान, चारा टंचाई तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाईसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक उपाययोजना कराव्यात. शेतकरी अडचणीत असल्याने त्यांच्याशी संवेदनशीलतेने वागावे, त्यांच्या अडचणी व म्हणणे समजून घ्यावे. शासन शेतकऱ्यांच्या सेवेसाठी असून, त्यांना आर्थिक पाठबळ देणे ही शासनाची जबाबदारी आहे, असे कृषी मंत्री भरणे यांनी सांगितले.

जिल्ह्यात पिण्याचे पाणी, चारा तसेच अखंडित वीजपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे. संकटाच्या काळात शासन शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात ५६ लाख शेतकऱ्यांना ४० हजार ३८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येणार असून, कर्जमाफी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करावे. कर्जमाफीची तिसरी यादी जाहीर झाली असून, उर्वरित शेतकऱ्यांच्या त्रुटींची पूर्तता होताच टप्प्याटप्प्याने कर्जमाफी देण्यात येईल. कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज उपलब्ध करून द्यावे तसेच कर्जमाफीची यादी संबंधित बँकांमध्ये प्रसिद्ध करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

दुष्काळी गावांच्या यादीबाबत खोटी माहिती व अफवा पसरविणाऱ्या बातम्यांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये. सॅटेलाईटच्या माध्यमातून विमा संरक्षणाबाबतची बाब तातडीने केंद्र शासनाच्या निर्दर्शनास आणून देण्यात येईल. चारा व पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे, असेही कृषी मंत्री भरणे यांनी सांगितले.

# कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुयणी येथे केली पीक परिस्थितीची पाहणी

## शेतकऱ्यांनी चिंता करू नये; शासन खंबीरपणे आपल्या पाठीशी



**नांदेड (प्रतिनिधी)–** कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुयणी येथे पीक परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पिकांची सद्यस्थिती, पावसाचे प्रमाण आणि संभाव्य नुकसानाबाबत त्यांनी माहिती घेतली.

शेतकऱ्यांनी मांडलेल्या समस्या आस्थेने ऐकून घेत, 'शेतकऱ्यांनी अजिबात चिंता करू नये. शासन खंबीरपणे आपल्या पाठीशी असून, जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील,' अशी ग्वाही भरणे यांनी दिली.

यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, कृषी विभागाचे अधिकारी व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# हडकोत मध्यरात्री थरार; १९ वर्षीय 'डोरेमॉन'ची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या, दोन संशयित ताब्यात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** हडको परिसरातील शाहूनगर (वाघाळा) येथे मध्यरात्री एका १९ वर्षीय तरुणाची धारदार शस्त्रांनी निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संघरत्न उर्फ 'डोरेमॉन' माधवराव वाघमारे (वय १९) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दि. १८ सप्टेंबरच्या मध्यरात्री साडेअकरा ते बारा वाजेच्या सुमारास हडको परिसरातील पाण्याच्या टाकीच्या आवारात ही रक्तरंजित घटना घडली. मारेकऱ्यांनी संघरत्नवर धारदार शस्त्रांनी जोरदार हल्ला चढवला. या अमानुष हल्ल्यात तो गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडला.

घटनेची माहिती मिळताच त्याला तातडीने पोलिसांनी विष्णुपुरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मध्यरात्रीच घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक तपासादरम्यान पोलिसांनी तातडीने हालचाली करत दोन संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, मृत संघरत्न उर्फ 'डोरेमॉन' याची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची असल्याची माहिती समोर येत आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीपासूनच तो गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय होता, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. एवढेच नाही तर तो एका गंभीर गुन्ह्यातून नुकताच जामिनावर सुटला होता, असेही पोलिसांकडून समजले.



**नांदेड–** शहरातील एअरपोर्ट रोडवर वसलेल्या भटक्या-विमुक्तांच्या पालामध्ये सध्या गणपती बाप्पाच्या आगमनाने उत्साहाचे वातावरण आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहूनही आधुनिक राष्ट्राची साक्ष देणाऱ्या आपल्या समृद्ध संस्कृती आणि परंपरांचे जतन आणि संवर्धन या पालामधील नागरिक अत्यंत श्रद्धेने करत आहेत. विषमतेच्या आणि संघर्षाच्या गर्तेतही आपल्या परंपरांचा वारसा जपणारा हा सोहळा समाजासाठी एक आदर्श वस्तुपाठ ठरत आहे.

# कर्ज वसुलीच्या जाचाला कंटाळून तरुणाची आत्महत्या तर जमिनीच्या वादातून व्यावसायिकाचा गोदावरीत जीव

## नांदेडमध्ये आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे दोन गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एका प्रकरणात बँकेच्या कर्ज वसुलीच्या तगाद्याला कंटाळून तरुणाने रेल्वेखाली जीव दिला असून, दुसऱ्या प्रकरणात जमिनीच्या व्यवहारावरून धमक्यांना कंटाळून एका व्यक्तीने गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचा आरोप आहे.

**कर्ज वसुलीच्या त्रासाला कंटाळून तरुणाची आत्महत्या**

लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वरळखेड शिवारातील रेल्वे रुळावर दि. १६ सप्टेंबर रोजी दुपारी ३.२१ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. मयत नितीन गौतम सदावर्ते (वय ३०, रा. दीपकनगर, तरोडा बु., नांदेड) याने एस बँकेकडून ३ लाख १५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. नऊ महिने त्याने नियमित हप्ते भरले.

मात्र, त्यानंतर त्याच्या वडिलांना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने उपचारासाठी पैसे खर्च झाले आणि कर्जाचे पुढील हप्ते थकले. याच कारणावरून बँकेतील कर्मचारी समीर, ज्योती व इतर कर्मचाऱ्यांनी संगनमत करून नितीनला वारंवार फोन करून शिवीगाळ व मानसिक त्रास दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या त्रासाला कंटाळून नितीनने तणावात येऊन रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केली.

याप्रकरणी मयताचा भाऊ दीपक गौतम सदावर्ते (वय ४२) यांच्या फिर्यादीवरून लिंबगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३४/२०२६, कलम १०८, ३५२, ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सपोनि बोधनकर करत आहेत.


**जमिनीच्या वादातून धमकी, गोदावरीत उडी घेऊन आत्महत्या**

दुसरी घटना वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे. दि. २८ जुलै ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत फिर्यादीच्या राहत्या घरी व गोवर्धन घाट, गोदावरी नदी परिसरात हा प्रकार घडला.

मयत व्यंकटेश सायगौड भुरेवाड (वय ५२, रा. शिवाजी चौक, भोकर) यांनी कनका भवन बारच्या जमिनीचा मोहम्मद हरून मोहम्मद युसूफ व रमिजोद्दीन तखयोद्दीन इनामदार यांच्यासोबत झालेला सौदा रद्द करावा आणि आम्ही दिलेली रक्कम घेऊन ती जमीन आमच्या नावावर करावी, अन्यथा तुला व तुझ्या कुटुंबाला जीवे मारू, अशी धमकी आरोपी अब्दुल मुबीन अब्दुल वाहेद, मोहम्मद असलम आयुब मांजरमकर, अब्दुल खालेद अब्दुल अजीज आणि शेख फहिम शेख इस्माईल (सर्व रा. भोकर) यांनी संगनमत करून दिल्याचा आरोप आहे.

# संपूर्ण नांदेड जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या -खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी) –**नांदेड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व म्हणजे सोळा तालुक्यांत अत्यल्प पावसामुळे परिस्थिती चिंताजनक आहे. शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट मदत करणे गरजेचे असून शासनाने वेळ न घालवता संपूर्ण नांदेड जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त म्हणून त्वरित घोषित करावा, अशी आग्रही भूमिका खा. रवींद्र चव्हाण यांनी आढावा बैठकीत घेतली.



संपूर्ण मराठवाड्यातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात शनिवारी झालेल्या आढावा बैठकीत खासदार रवींद्र चव्हाण यांनी विविध मुद्दे उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. सोयाबीन शेंगा भरणीच्या वेळेलाच पावसाने खंड दिल्यामुळे संपूर्ण सोयाबीन पीक शेतकऱ्यांच्या हातून गेले आहे एवढेच नव्हे तर इतर पिके व फळबागाही धोक्यात असून शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची आवश्यकता असल्याचे त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या बैठकीत सादर केलेली माहिती अत्यंत योग्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील अनेक भागात पाणी उपलब्ध असूनही खंडित वीज पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना शेतीपंपाद्वारे पाणी देणे शक्य होत नाही, नायगाव, उमरी, धर्माबाद तसेच कंधार लोहा सारख्या तालुक्यात ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे तेथे वीज पंपांना किती तास वीज पुरवठा मिळणार असा प्रश्न त्यांनी ऊर्जामंत्री मेघना बोर्डीकर यांना विचारला. वीज पुरवठ्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान खा. रवींद्र चव्हाण यांनी शासकीय विश्रामगृहात कृषिमंत्री भरणे यांची भेट घेऊन त्यांना अखिल भारतीय समन्वयित कृषी हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे हवामान बदलासाठी उत्कृष्टतेचे केंद्र स्थापन करण्यासाठी मंजूर २५ कोटींचा निधी उपलब्ध करून घेण्याची मागणी एका निवेदनाद्वारे केली.

# सावित्रीबाई काळेवाड यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** वाघाळा नांदेड येथील रहिवाशी ज्येष्ठ महिला नागरीक सावित्रीबाई काशिराम काळेवाड (वय- ६५ वर्ष ) यांचे १८ सप्टेंबर रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता वाघाळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, तीन मुले, जावाई, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त मुख्य लेखा अधिकारी वनविभाग काशीराम काळेवाड यांच्या पत्नी तर भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद काळेवाड, महेश, सतीश व ज्योती यांच्या त्या मातोश्री होत.

# शीलाबाई परदेशी यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील दिलीपसिंघ कॉलनीतील रहिवासी श्रीमती शीलाबाई चंदूसिंह परदेशी-चौधरी यांचे शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात ७ मुले, सुना, नाती, नातू, नातजावई असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता राहते घर दिलीपसिंघ कॉलनी, भसीन मंगल कार्यालयाजवळ येथून निघून शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नांदेड जिल्हा टेन्ट मालक संघटनेचे पदाधिकारी विजयसिंह परदेशी, दिलीप, विनोद, महेंद्र, धरम, विक्रम यांच्या त्या आई तर अभिजित मनोज परदेशी यांच्या त्या आजी होत.

## गणेश दर्शन



श्री फ्रेन्ड्स गणेश मंडळ, तिरंगा चौक, हनुमान पेठ, नांदेडचा महाराजा




श्री द्वारकाधीश गणेश मंडळ, गवळीपुरा, नांदेड




ब्रज नवयुवक गणेश मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, नांदेड




जिल्हा परिषद कर्मचारी गणेश मंडळ, नांदेड




जिल्हा मध्यवर्ती बँक गणेश मंडळ, नांदेड (छाया : करणसिंह बैस)


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com